पुढारी

# प्राध्यापकांचे वेतन रखडणार

## ‘लॉकडाऊन’चा परिणाम; वेतन देयकास उशीर होण्याची चिन्हे

**कोल्हापूर : प्रवीण मस्के**

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील तीन जिल्ह्यातील संलग्नित महाविद्यालयांमधील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन कोरोनामुळे करण्यात आलेल्या लॉकडाऊनमुळे रखडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विद्यापीठ कार्यक्षेत्रातील सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्हे उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयाच्या कक्षेत येतात. तीन जिल्ह्यांत सुमारे १३३ अनुदानित महाविद्यालये आहेत. २५०० प्राध्यापक व २२०० शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा यात समावेश आहे.

राज्य सरकारने कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ३१ मार्चपर्यंत महाविद्यालये बंद ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे महाविद्यालयांमधील कामकाज बंद ठेवण्यात आले आहे. प्राचार्यांच्या सहीने वेतन देयके जमा केली जातात. त्याच्या अनुषंगाने उच्चशिक्षण सहसंचालक मान्यता देऊन कोषागार कार्यालयात बिले पाठवितात. दरवर्षी मार्च एंडमुळे काही दिवस वेतन लांबते.



### ५५० कर्मचाऱ्यांचे विद्यापीठ फंडातून पगार

शिवाजी विद्यापीठ फंडातून सुमारे ८०० हून अधिक प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन केले जाते. यातील ५५० कर्मचाऱ्यांचा विद्यापीठ फंडातून पगार केला जातो. शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर ते जमा करून घेतले जाते, अशी माहिती विद्यापीठ प्रशासनातील अधिकाऱ्यांनी दिली.

> कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यभर लॉकडाऊन आहे. उच्चशिक्षण सहसंचालक कार्यालयातील कर्मचाऱ्यांची संख्या पाच टक्के ठेवण्याचे आदेश आहेत. शासनाकडून बजेटबाबत अनिश्चितता असल्याने अद्याप काही सांगणे अवघड ठरेल.
>
> **- डॉ. अशोक उबाळे,**
> विभागीय उच्चशिक्षण सहसंचालक

कोरोना विषाणूचा राज्यभर संसर्ग वाढत चालल्याने लॉकडाऊन करण्यात आले आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद आहे. त्यामुळे महाविद्यालयांकडून वेतन देयके तयार करण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. तसेच उच्च शिक्षण सहसंचालक कार्यालय व कोषागार कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतेमुळे प्राध्यापकांचे वेतन लांबण्याची शक्यता वाढली आहे.